पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक- १०
सभावृत्तांत

दि.- ०७/०१/२०१५ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची सभा बुधवार दिनांक ०७/०१/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता इ क्षेत्रीय कार्यालयाचे “संत ज्ञानेश्वर महाराज” सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१ मा.सुरेखा शंकर गव्हाणे – सभापती
२ मा.आल्हाट मंदा उत्तम
३ मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
४ मा.काळजे नितीन प्रताप
५ मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
६ मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
७ मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
८ मा.सुपे आशा रविंद्र
९ मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
१० मा.गोफणे अनुराधा देविदास
११ मा.Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
१२ मा.लोंढे शुभांगी संतोष
१३ मा.विश्वनाथ विठोबा लांडे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.आशादेवी दुरगूडे- इ क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.दांगट- प्रशासन अधिकारी, मा.वसंत साळवी- कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.श्री.जयंत बरशेट्टी- कार्यकारी अभियंता-(पाणीपुरवठा),मा.प्रविण घोडे –कार्यकारी अभियंता – (विद्युत), मा.श्री.शिंदे एच.एस. उपअभियंता स्थापत्य, मा.श्री.व्ही.बी.माने – उपअभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री. भाऊसाहेब साबळे - उपअभियंता, मा.श्री.वाघमारे एस.बी. उपअभियंता स्थापत्य, मा.श्री.व्ही.सी.काळे- कनिष्ट अभियंता - (विदयुत), मा.श्री.सेठीया मनोज उपअभियंता-जन:निसारण, श्री.इ.बी.पाटील- उप अभियंता, -मा.श्री.सुरेश इप्प्कायल- लेखाधिकारी, मा.श्री.एस.डी.लगस - सहा.आरोग्याधिकारी, मा.श्री.गौड जितसिंग हिरासिंग -मुख्याध्यापक, सौ. थोरवे सुजाता –मुख्याध्यापिका, मा.श्री. शिरोळे एस.डब्ल्यू – प्र.मुख्याध्यापक,

----

मा.सभापती - सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

---

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक १) मौजे भोसरी स.नं.२०० पै मधून कलम २०५ नुसार रस्ता घोषीत करणे व नुकसान भरपाई देणेबाबत. मा.वसंतराव (नाना) लोंढे यांचे पत्र.

विषय क्रमांक २)लांडेवाडी प्रभाग क्र.३६ येथे सुलभ शौचालये उभारणेबाबत मा.विश्वनाथ विठोबा लांडे यांचे पत्र.

विषय क्रमांक ३) लांडेवाडी प्रभाग क्र.३६ येथील प्रलंबित विकास कामांबाबत मा.विश्वनाथ विठोबा लांडे यांचे पत्र.

विषय क्रमांक ४) लांडेवाडी प्रभाग क्र.३६ येथील दत्तमंदीर ते पुणे नाशिक महामार्गापर्यंतचा रस्ता व लांडेवाडी चौक ते आर्शिवाद गॅस एजन्सी चौक या परिसरात रस्त्याचे बाजूने शिवाजी महाराजांच्या इतिहासाच्या आधारावर मॉरल्स उभारणेबाबत. मा.विश्वनाथ विठोबा लांडे यांचे पत्र.

विषय क्रमांक ५) लांडेवाडी प्रभाग क्र.३६ येथील दत्त मंदीर रस्त्यावर आर्शिवाद गॅस एजन्सी चौक येथे स्वागत कमान उभारणेबाबत. मा.विश्वनाथ विठोबा लांडे यांचे पत्र.

विषय क्रमांक ६) शालेय भौतिक सुविधेबाबत.मा.मुख्याध्यापिका पि चि म.न.पा.वैष्णोमाता प्राथमिक शाळा इंद्रायणीनगर भोसरी यांचे पत्र.

त्यानंतर खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली-

-----

**सुचक-** मा. विनया तापकीर **अनुमोदक-** मा.सुपे आशा रविंद्र

वारकरी संप्रदायातील सामाजिक ज्येष्ठ कार्यकर्ते कै.मल्हारराव गोविंदराव वाबळे, कै.पार्वतीबाई बापुराव कु-हाडे, कै.शांताबाई गुळवे, कै.शकुंतला आगरवाल, कै.जगन्नाथ पाबळे- सामाजिक कार्यकर्ते यांचे निधन झालेने त्यांना इ प्रभाग समितीच्या वतीने भावपुर्वक श्रध्दांजली करीता सर्वानी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी. तसेच विकास कामे वेळेवर होत नसल्याने प्रशासनाचा निषेध म्हणून इ प्रभाग समिती सभा शनिवार दिनांक १७/०१/२०१५ रोजी दुपारी २.४५ वा.पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(सर्वानी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

------

**मा.सभापती-** विकास कामे वेळेवर होत नसल्याने प्रशासनाचा निषेध म्हणून इ प्रभाग समिती सभा शनिवार दिनांक १७/०१/२०१५ रोजी दुपारी २.४५ वा.पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
सुरेखा शंकर गव्हाणे
सभापती
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक- १०
सभावृत्तांत
(दिनांक ०७/०१/२०१५ ची तहकूब सभा)

दिनांक -१७/०१/२०१५ वेळ दुपारी २:४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची सभा बुधवार दिनांक ०७/०१/२०१५ रोजीची तहकूब सभा शनिवारी दुपारी २.४५ वाजता इ क्षेत्रीय कार्यालयाचे “संत ज्ञानेश्वर महाराज” सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१ मा.सुरेखा शंकर गव्हाणे – सभापती
२ मा.काळजे नितीन प्रताप
३ मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
४ मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५ मा.सुपे आशा रविंद्र
६ मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
७ मा.जालिंदर (बाप्पू) शिंदे
८ मा.श्रध्दा बाजीराव लांडे
९ मा.Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
१० मा.लोंढे शुभांगी संतोष

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.आशादेवी दुरगुडे- इ क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.दांगट- प्रशासन अधिकारी, मा.वसंत साळवी- कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.श्री.जयंत बरशेट्टी- कार्यकारी अभियंता-(पाणीपुरवठा),मा.प्रविण घोडे –कार्यकारी अभियंता – (विद्युत), मा.श्री.शिंदे एच.एस. उपअभियंता स्थापत्य, मा.श्री.व्ही.बी.माने – उपअभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.वाघमारे एस.बी. उपअभियंता स्थापत्य, मा.श्री.व्ही.सी.काळे- कनिष्ट अभियंता - (विदयुत), मा.श्री.सेठीया मनोज उपअभियंता-जन:निसारण, श्री.इ.बी.पाटील- उप अभियंता, मा.श्री.बी.आर.काची- उपअभियंता- मा. श्री. सुरेश इप्प्कायल- लेखाधिकारी, मा.श्री.एस.डी.लगस - सहा.आरोग्याधिकारी, मा.श्री.गौड जितसिंग हिरासिंग - मुख्याध्यापक, सौ. थोरवे सुजाता – मुख्याध्यापिका, मा.श्री.मुंढे पराग–शिक्षण मंडळ, मा.जी.एन.खैरे सहा.उद्यान निरीक्षक, मा.श्री.एस.डी. रावते – असि.सुपरवायझर. मा.आर.एन.भाट – मुख्य आरोग्य निरीक्षक- पशुवैद्यकिय

----

**मा.सभापती -** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

----

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक १) मौजे भोसरी स.नं.२०० पै मधून कलम २०५ नुसार रस्ता घोषीत करणे व नुकसान भरपाई देणेबाबत. मा.वसंतराव (नाना)आनंदराव लोंढे यांचे पत्र.

विषय क्रमांक २)लांडेवाडी प्रभाग क्र.३६ येथे सुलभ शौचालये उभारणेबाबत मा.विश्वनाथ विठोबा लांडे यांचे पत्र.

विषय क्रमांक ३) लांडेवाडी प्रभाग क्र.३६ येथील प्रलंबित विकासकामांबाबत
मा.विश्वनाथ विठोबा लांडे यांचे पत्र.

विषय क्रमांक ४) लांडेवाडी प्रभाग क्र.३६ येथील दत्तमंदीर ते पुणे नाशिक महामार्गापर्यंतचा रस्ता व लांडेवाडी चौक ते आर्शिवाद गॅस एजन्सी चौक या परिसरात रस्त्याचे बाजूने शिवाजी महाराजांच्या इतिहासाच्या आधारावर मॉरल्स उभारणेबाबत.
मा.विश्वनाथ विठोबा लांडे यांचे पत्र.

विषय क्रमांक ५) लांडेवाडी प्रभाग क्र.३६ येथील दत्त मंदीर रस्त्यावर आर्शिवाद गॅस एजन्सी चौक येथे स्वागत कमान उभारणेबाबत. मा.विश्वनाथ विठोबा लांडे यांचे पत्र.

विषय क्रमांक ६) शालेय भौतिक सुविधेबाबत.मा.मुख्याध्यापिका पि चि म.न.पा.वैष्णोमाता प्राथमिक शाळा इंद्रायणीनगर भोसरी यांचे पत्र.

-----

**सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आलेले विषय दाखल करुन घेण्यात आले.**

**-----**

ठराव क्रमांक- २०　　　　विषय क्रमांक- १
दिनांक- १७/०१/२०१५
सूचक- मा.सुनिता(माई)पांडूरंग गवळी　　　　अनुमोदक- चंद्रकांत वाळके
संदर्भ- मा.वसंतराव (नाना)आनंदराव लोंढे, मा.चंद्रकांत वाळके यांचे पत्र.

मौजे भोसरी प्रभाग क्र.३० चक्रपाणी वसाहत येथे शास्त्री चौक ते फुलेनगर जोडणारा मुरकुटे कॉर्नर पर्यंत रस्ता रहदारीचा आहे. तथापि स.नं.२०० मध्ये जागामालक रस्ता करणेस मज्जाव करीत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र महापालिका अधिनियम चे कलम २०५ नुसार सदरचा रस्ता घोषीत करुन जागा मालकांना नियमानुसार मोबदला देणेबाबत सदरचा रस्ता कलम २०५ नुसार घोषीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक- २१　　　　विषय क्रमांक- २
दिनांक- १७/०१/२०१५
सूचक- मा.विश्वनाथ विठोबा लांडे　　　　अनुमोदक- चंद्रकांत वाळके
संदर्भ- मा.विश्वनाथ विठोबा लांडे , मा.चंद्रकांत वाळके यांचे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. ३६ लांडेवाडी येथे भोसरी ते निगडी रस्त्यावर चौकाचे सुशोभीकरण करण्यात आलेले असून या ठिकाणी शिवसृष्टी उभारण्यात आलेली आहे. याच रस्त्यावर टेल्को कंपनी आहे. त्यामुळे या रस्त्यावर नेहमीच कामगार तसेच नागरीकांची रहदारी असते. लांडेवाडी चौकामध्ये शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा व शिवसृष्टी असल्याने चौक व परिसराचे पावित्र्य राखणे आवश्यक आहे. त्यामुळे या परिसरात राजमाता महाविद्यालयामागील मोकळी जागा, ऍम्फेनॉल कंपनी भिंतीजवळच्या डी.पी.जवळ, व शाम सिमेंट एजन्सी टेल्को रोड जवळ या ठिकाणी पुरुष व महिलांसाठी सुलभ शौचालय उभारण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक- २२　　　　विषय क्रमांक- ३
दिनांक- १७/०१/२०१५
सूचक- मा.विश्वनाथ विठोबा लांडे　　　　अनुमोदक- चंद्रकांत वाळके
संदर्भ- मा.विश्वनाथ विठोबा लांडे , मा.चंद्रकांत वाळके यांचे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागाच्या विकास आराखडयातील लांडेवाडी प्रभाग क्र. ३६ मधील विकास कामे प्रलंबित असून सदर प्रलंबित विकास कामे पुर्ण होणे आवश्यक असून विकास आराखडयातील रस्त्याची व इतर आरक्षणे विकसीत करणेबाबत – कै. अंकुशराव

लांडगे नाटयगृह ते गुळवे वस्ती एमआयडीसी कडे इंद्रायणीनगर कडे जाणारा डी.पी.प्लॅनमधील रस्ता त्वरीत तयार करणेबाबत, सर्व्हे. नं. १ मधील धावडेवस्ती ते लांडेवाडी नाल्याच्या कडेने १२ मीटर रस्त्याचे आरक्षण ताब्यात घेवून विकसीत करणेबाबत, बाबा आनंद मंगल कार्यालयासमोरील नाल्याच्या बाजूने ते नवीन सर्व्हे नं. १ मधील हॉस्पिटलच्या बाजूने शांतीनगरलगत महात्मा फुले शाळेच्या पश्चिम बाजूने फायर ब्रिगेड शेजारील पुलापर्यंत असणारा डी.पी.रस्ता त्वरीत तयार करणेबाबत, आरक्षण क्र.४२७ खेळाचे मैदान आरक्षण ताब्यात घेऊन विकसीत करणेबाबत, लांडेवाडी प्रभाग क्र. ३६ येथील दत्तमंदीर – बाबर पेट्रोल पंप–आशिर्वाद गॅस एजन्सी चौक ते पुणे नाशिक रस्त्याच्या बाजूने – राजमाता महाविद्यालय दत्तमंदीर या मार्गावर जॉगींग ट्रॅक तयार करणेबाबत, लांडेवाडी प्रभाग क्र. ३६ येथील दत्तमंदीरजवळ वाचनालय उपलब्ध करणे बाबत, लांडेवाडी प्रभाग क्र. ३६ येथील दत्तमंदीर रस्त्यावर आशिर्वाद गॅस एजन्सी चौक येथे छत्रपती शहाजीराजे प्रवेशद्वार उभारणेबाबत, लांडेवाडी प्रभाग क्र. ३६ येथे राजमाता महाविद्यालयामागील मोकळी जागा,ऍम्फेनॉल कंपनी भिंतीजवळच्या डी.पी.जवळ, शाम सिमेंट एजन्सी टेल्को रोड जवळ सुलभ शौचालये उभारणे, लांडेवाडी प्रभाग क्र.३६ येथील ठिकठिकाणी ड्रेनेजच्या चेंबर्सची व पाईप लाईनची दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- २३ विषय क्रमांक- ४
दिनांक- १७/०१/२०१५
सूचक- मा.विश्वनाथ विठोबा लांडे अनुमोदक- चंद्रकांत वाळके
संदर्भ- मा.विश्वनाथ विठोबा लांडे , मा.चंद्रकांत वाळके यांचे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील लांडेवाडी प्रभाग क्र.३६ येथे लांडेवाडी चौकामध्ये छत्रपती श्री.शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा व शिवसृष्टीची उभारणी करण्यात आलेली असून त्यामुळे परिसराचे सुशोभीकरण झालेले आहे. त्या लगतच पुढे दत्तमंदीर ते पुणे नाशिक रस्त्यास जोडणारा रस्ता आहे या रस्त्याच्या प्रथम दर्शनी स्वागत कमानीचे काम महानगरपालिकेकडून सुरु आहे. लांडेवाडी चौक ते आशिर्वाद गॅस एजन्सी चौकापर्यंत जो दुसरा रस्ता आहे या रस्त्याच्या कडेने शिवाजी महाराजाच्या इतिहासाच्या आधारावर शिवचरित्रांचे मॉरल्स उभारल्यास लांडेवाडी व परिसराचे सुशोभिकरण होईल. व याचबरोबर परिसरातील नागरिकांसाठी पर्यटनाचे केंद्र होईल. लांडेवाडी प्रभाग क्र. ३६ येथील दत्तमंदीर ते पुणे नाशिक महामार्गापर्यंतचा रस्ता व लांडेवाडी चौक ते आशिर्वाद गॅस एजन्सी चौक या परिसरात रस्त्याचे बाजूने शिवाजी महाराजांच्या इतिहासाच्या आधारावर मॉरल्स उभारण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक- २४ विषय क्रमांक- ५
दिनांक- १७/०१/२०१५
सूचक- मा.विश्वनाथ विठोबा लांडे अनुमोदक- चंद्रकांत वाळके
संदर्भ- मा.विश्वनाथ विठोबा लांडे , मा.चंद्रकांत वाळके यांचे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील लांडेवाडी प्रभाग क्र.३६ येथे लांडेवाडी चौकामध्ये छत्रपती श्री.शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा व शिवसृष्टीची उभारणी करण्यात आलेली असून त्यामुळे परिसराचे सुशोभीकरण झालेले आहे. चौकाचे पुढे दत्तमंदीर ते पुणे नाशिक रस्त्यास जोडणारा रस्ता आहे या रस्त्यावर आशिर्वाद गॅस एजन्सी चौकामध्ये परिसरातील नागरीकांनी स्वागत कमान उभारण्याची मागणी केलेली आहे. स्वागत कमान उभारल्यास परिसराच्या सुशोभिकरणास मदत होईल लांडेवाडी प्रभाग क्र.३६ येथील दत्तमंदीर रस्त्यावर आशिर्वाद गॅस एजन्सी चौक येथे स्वागत कमान उभारण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक- २५ विषय क्रमांक- ६
दिनांक- १७/०१/२०१५
सूचक- मा. अनुमोदक-
संदर्भ- मा.मुख्याध्यापिका, पिं. चिं. म.न.पा. वैष्णोमाता प्राथमिकशाळा, इंद्रायणीनगर, भोसरी यांचे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुले व मुली शाळा सकाळ व दुपार सत्रात भरत असून शिक्षण घेणारी ४५० विद्यार्थी असून बालवाडीचे २०० मुले या ठिकाणी शिकत आहे. कर्मचारी संख्या १५ आहे. शाळेला भौतीक सुविधा मिळणेबाबत. शाळेच्या जवळून नाला व विहीरी असल्यामुळे सरपटणा-या प्राण्यांचा वावर जास्त आहे. त्यामुळे विद्यार्थी व कर्मचारी यांना धोका संभवतो. शाळेला सिंमाभित घालून मिळणे बाबत. जेणेकरुन विद्यार्थी मुक्तपणे शिक्षण घेतील, शाळेला आतून बाहेरुन रंग देणे गरजेचे आहे. त्यामुळे वातावरण प्रसन्न राहील. वर्गाच्या खिडक्या व दारे तुटलेली आहेत. जुने दरवाजे काढून नवीन दरवाजे बसविणे बाबत. जेणेकरुन शालेय रेकॉर्ड सुरक्षित राहील, पिण्याच्या पाण्याच्या टाकीजवळ दररोज तोटी तुटल्यामुळे पाणी व खरकटे साचते त्याचा निचरा होण्यासाठी साचणा-या पाण्याला चर काढून देणेबाबत. जेणेकरुन साचलेल्या पाण्यावर डास होणार नाही, शाळेच्या समोर व सभोवताली पाणी साचते ते पाण्यासाठी उतार काढून पेव्हींग क्लॉक बसवून देणेबाबत. म्हणजे मधल्या सुट्टीत विद्यार्थी मध्यान्न भोजनासाठी स्वच्छ जागेवर बसतील, विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी एक एक मुतारी आहे परंतू त्या ठिकाणी पाणी जाण्यासाठी योग्य उतार नाही व पाईपची सुविधा नाही त्यामुळे दुर्गंधी येते त्यामुळे मुतारीतील पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी पाईप टाकून योग्य उतार काढणेबाबत. या सर्व भौतीक सुविधा शाळेत उपलब्ध करुन देणेबाबत. जेणे करुन विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास होईल व बौध्दीक दर्जा उंचावण्यास मदत होईल. वरील भौतिक सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
सुरेखा शंकर गव्हाणे
सभापती
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/ ०४/कावि/३१/२०१५
दिनांक- २८/०१/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
**इ क्षेत्रीय कार्यालय**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.